सकाळ

# ‘रवळनाथ’मध्ये महिलांसह सैनिकांसाठी सहकार ठेव योजना

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. १७ : अखिल भारतीय सहकार सप्ताहानिमित्त श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीने खास महिला व आजी-माजी सैनिकांसाठी ७.७५ टक्के व्याजदराने ‘सहकार ठेव योजना’ सुरु केली आहे. १८ महिने मुदतीच्या या योजनेची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर असून, त्याचा इच्छुकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी केले आहे.



**एम. एल. चौगुले**

ते म्हणाले, ‘सध्या संस्थेत ३६५ कोटींच्या ठेवी आहेत. घरबांधणी व प्लॉट खरेदीसाठी २५१ कोटींची कर्जे वितरित केली आहेत. १३४ कोटींची गुंतवणूक असून सर्व ठेवी व कर्जे सुरक्षित आहेत. संस्थेच्या अर्थसहाय्यातून ३३८० घरे साकारली आहेत. पैकी २५० पेक्षा अधिक घरे सैन्य दलातील जवान व पोलिसांची आहेत. महिला व सैनिकांना घर बांधणीसाठी प्राधान्याने व सवलतीच्या व्याज दरात कर्ज पुरवठा केला जातो. त्यांच्या ठेवींनाही चांगले व्याज मिळावे म्हणून सहकार ठेव योजना सुरु केली आहे. केवळ नवीन ठेवींसाठीच हा व्याजदर लागू असून गरजेनुसार त्यावर ठेवतारण कर्जही घेता येईल. अधिक महितीसाठी इच्छुकांनी नजीकच्या शाखेत संपर्क साधावा.’

Kolhapur, Gadhinglaj-Today
18/11/2022 Page No. 3